# बेकायदा अग्निशस्त्र बाळगणारे आरोपींकडून दोन अग्निशस्त्रे व चार काडतूसे जप्त आरोपी अटकेत

पुणे महारनगर पालिका निवडणुक सन २०१७ शांततेत पार पडण्याकरीता वरिष्ठांच्या सुचनांप्रमाणे व मार्गदर्शनाप्रमाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सिताराम मोरे यांनी गुन्हे शाखा युनिट-३ कडील कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे दि. ३०/०१/२०१७ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस हवालदार अनिल घाडगे व पोलीस नाईक संदीप तळेकर यांना बेकायदेशीर अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या इसमाचे बाबत मिळालेल्या बातमीवरून, आरोपीत १) मुकेश परशुराम चित्ते वय २१ वर्ष रा. शिवनेरी नगर, गल्ली नंबर १२, महालक्ष्मी मंदिराजवळ कोंढवा पुणे २) कुणाल कल्याणराव शितोळे वय २८ वर्ष रा. मु.पो.शितोळेवस्ती, पाटस ता.दौंड जिल्हा पुणे यांना ताब्यात घेतले.

आरोपीत क्रं १) मुकेश परशुराम चित्ते वय २१ वर्ष रा. शिवनेरी नगर, गल्ली नंबर १२, महालक्ष्मी मंदिराजवळ कोंढवा पुणे यास. मार्केटयार्ड शेवटचा बस स्टॉप गेट नंबर ९ जवळ, पुणे येथे १२.४५ वा ताब्यात घेवून त्याचे कब्जातून एक पिस्टल व तिन काडतुसे व रोख रक्कम अशा ४०,९००/- रू. चे मालासह ताब्यात घेतले.

आरोपीत क्रं २) कुणाल कल्याणराव शितोळे वय २८ वर्ष रा. मु.पो.शितोळेवस्ती, पाटस ता.दौंड जिल्हा पुणे यास १२.३० वा. कटारीया हायस्कुल समोर,मुकुंदनगरर रोड स्वारगेट पुणे येथे ताब्यात घेवून त्याचेकडून एक देशी बनावटीचे पिस्टल व एक काडतुस, रोख २००/- व एक काळे रंगाची महिंद्रा टी.यु.व्ही कार, आर.टी.ओ नंबर एम.एच.४२-ए.एच.९०९५ अशा किं.रू ६,४०,४००/- चे मालासह ताब्यात घेतले.

वरिल दोन्ही आरोपीतांकडून दोन देशी बनावटीचे पिस्टल व ४ राऊंड, महिंद्रा टी.यु.व्ही कार असा किं.रू ६,८१,३००/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री.दिपक साकोरे, अतिरिक्त कार्यभार अपर पोलीस आयुक्त, श्री.पी.आर.पाटील, पोलीस उप-आयुक्त, श्री.सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सिताराम मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, रविंद्र बाबर, पोलीस उप निरीक्षक, श्री प्रकाश अवघडे, अनिल घाडगे, संदिप तळेकर, गुणशिलण रंगम, रोहीदास लवांडे, यांनी केली आहे.


गुन्हे शाखा युनिट ३
पुणे शहर


गुन्हे शाखा युनिट ३
पुणे शहर
गुन्हे शाखा युनिट ३
पुणे शहर